जा.क्र.प्राफसंकें/नर्सरी/ 1871 /२०२०
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले.
दिनांक :– 25 JUN 2020

प्रति,

______________________

______________________

______________________

विषय :– ठेकेदारी पध्दतीने विक्रीयोग्य आंबा/काजू कलमे तयार करण्यासाठीचे दरपत्रक पुरविणेबाबत....

महाशय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ले येथे सन २०२०–२०२१ या कालावधीमध्ये ६०,००० नग विक्रीयोग्य आंबा कलमे व ६०,००० नग विक्रीयोग्य काजू कलमे तयार करण्यासाठी मजूरीचा दर दिनांक १०/०७/२०२० पर्यंत मागविण्यात येत आहे. कलमे तयार करण्यासंबंधिच्या अटी व शर्ती आणि दरपत्रकाचा नमुना फॉर्म विद्यापीठ संकेतस्थळ www.dbskkv.org वर पाहावयास मिळतील. प्रत्येक प्रकारच्या कलमासाठी स्वतंत्र दरपत्रक सादर करावयाचे आहे. तसेच दरपत्रकासोबत रक्कम रु. ५,०००/– (रु. पाच हजार मात्र) चा धनाकर्ष अनामत रक्कम म्हणून व पॅन कार्डची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

१. दरपत्रकात सर्व करांचा उल्लेख असावा.
२. आंबा व काजू कलमे तयार करण्याच्या कामाचे स्वतंत्र दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
३. बंद पाकिटावर **'विक्रियोग्य आंबा/काजू कलमे तयार करण्याचे दरपत्रक'** असा उल्लेख असावा.
४. डाकघराद्वारे दरपत्रक मिळण्यास उशिर झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहाणार नाही.
५. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरूस्त करण्याचा किंवा नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र
वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग

**प्रत: प्रसिध्दीसाठी रवाना**

१) मा. संचालक विस्तार शिक्षण, डॉ. बा.सा.को.कृ.वि., दापोली यांना विनंती करण्यात येते की, वरील दरपत्रक मसूदा विदयापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन मिळावा.
२) मा. प्रमुख, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र संकेत akmudbskkv@gmail.com स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

# <u>दरपत्रक</u>

## विक्री योग्य आंबा आणि काजू कलमे तयार करण्याचे दरपत्रक

दिनांक :—

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ले, जि.सिंधुदुर्ग.

**<u>विषय</u> :—** सन २०२०—२०२१ या हंगामात आंबा/काजू विक्री योग्य कलमे तयार करण्यासाठीचे दरपत्रक.

महोदय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले येथे सन २०२०—२१ या हंगामात आंबा/काजू कलमे तयार करून देण्यासाठी मी खालील प्रमाणे दर देत आहे.

| कलमांचा प्रकार | दर प्रती कलम (रु.) |
|---|---|
| आंबा कलमे / काजू कलमे | |

(अक्षरी रुपये ........................................................................................ मात्र)

मी आंबा/काजू कलमे तयार करण्याबाबतच्या अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत व त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. अटी आणि शर्तीचे मी काटेकोरपणे पालन करीन आणि त्यानुसारच मी वरीलप्रमाणे दर देत आहे.

आपला विश्वासू,

ठेकेदाराचे पूर्ण नांव व पत्ता

.................................................

.................................................

.................................................

.................................................

# प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले
## रोपवाटिका विभाग
### विक्री योग्य आंबा/काजू कलमे ठेकेदारी पद्धतीने तयार करावयाच्या कामाच्या अटी व शर्ती

१. दरपत्रकाचे कोरे फॉर्म व अटी शर्ती विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर पहावयास मिळतील. सदर दरपत्रक सिलबंद लखोटयामध्ये बंद करुन निम्नस्वाक्षरीकार यांचे नांवे दि. १०/०७/२०२० रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत स्विकारली जातील व त्याच दिवशी सायं. ५.३० वाजता गठित समिती व उपस्थित ठेकेदार/प्रतिनीधीन समक्ष उघडण्यात येतील.

२. दरपत्रकामध्ये खाडाखोड, बदल किंवा नमूद केलेल्या दराचे व रक्कमेचे आकडे गिरविणे, खाडाखोड करणे इत्यादि गोष्टी आढळून आल्यास दरपत्रक रद्द केले जाईल.

३. दरपत्रक हे विहित फॉर्ममध्ये सादर केले पाहिजे.

४. दरपत्रकातील दर हे सर्व कर जमेस धरून (उदा. विक्रीकर, सर्वसाधारण विक्रीकर, एक्साईज डयुटी, जकात व वाहतूक खर्च इत्यादि) असावेत.

५. दरपत्रक भरणाऱ्यांनी दरपत्रकासोबत अनामत रक्कम म्हणून रुपये ५,०००/— (रुपये पाच हजार मात्र) धनादेशाव्दारे भरावी लागणार आहे. धनादेश हा **''डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ वेंगुर्ला''** या नांवे **'वेंगुर्ला बॅंक शाखेवर देय'** राष्ट्रीयकृत बॅंकेचा काढावा.

६. एखादे दरपत्रक उघडया लखोटयातून किंवा उल्लेखित केलेल्या तारखेनंतर अथवा वेळेनंतर आले तर त्याचा विचार केला जाणार नाही.

७. स्विकृत ठेकेदारास अटी शर्ती प्रमाणे रुपये १००/— (रुपये शंभर मात्र) किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर प्रत्यक्ष कामाच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे करारपत्र स्वखर्चाने करावे लागेल.

८. नियमाप्रमाणे आयकराची वसूली देयकातून करण्यात येईल.

९. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचे अधिकार सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ले कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

१०. ठेकेदारी क्षमता, विद्यापीठाचा पूर्वानुभव आणि गरज या बाबी लक्षात घेऊन कलमे बांधण्याचे काम वेगवेगळया ठेकेदारांना विभागून देण्याचे अधिकार केंद्र प्रमुखांचे राहतील.

११. ठेकेदारी पद्धतीने कलमे बांधण्याचा अनुभव असलेल्या व्यक्तिंना प्राधान्य दिले जाईल. अनुभवाचा दाखला सोबत जोडावा.

१२. कलमे करण्याचे दिलेले काम कमीत कमी ८० टक्के पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा, संबंधित ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करणेत येईल. याबाबत केंद्रप्रमुखांनी घेतलेला निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.

१३. ठेकेदाराला विद्यापीठाच्या इतर रोपवाटिकेतून ठेकेदारी घेता येणार नाही तसे समजल्यास त्याच्याकडून काम त्वरीत काढून घेऊन झालेल्या कामाची मजूरी व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. ठेकेदार हा नर्सरीधारक नसावा.

१५. माती वाहतूकीपूर्वी मातीचा नमुना संबंधित अधिकाऱ्याला दाखवून पसंत केल्यास नंतरच माती वाहतूक करावयाची आहे.

१६. प्रत्येक कलमाला पुरविणेत आलेली लेबल्स् सुचनेनुसार बांधावयाची आहेत.

१७. कलमे तयार करण्यासाठी वितरीत करण्यात येणारे साहित्य व हत्यारे इ. फक्त ठेकेदारांनाच देण्यात येतील. त्यांच्या प्रतिनिधींना देण्यात येणार नाही.

*पुढील पृष्ठावर पहा.....*

१८. ठेकेदारांचा कलमे निर्मितीच्या कामात प्रत्यक्ष सहभाग असणे आवश्यक आहे. कारण मिळालेले काम हे ठेकेदाराचे कौशल्य व इतर माहितीवर आधारीत आहे.

१९. प्राप्त झालेल्या दरपत्रकांमधून कमीत कमी दराचे दरपत्रक स्विकारण्यात येईल. असे स्विकृत झालेले कमीत कमी दराचे दरपत्रक ज्या ठेकेदाराचे असेल त्या ठेकेदारास संकल्पीत कामाच्या सर्वसाधारणपणे ४० टक्के, दुसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारास सर्वसाधारणपणे ३० टक्के, तिसऱ्या क्रमांकाच्या ठेकेदारास सर्वसाधारणपणे २० टक्के तर चौथ्या क्रमांकाच्या ठेकेदारास सर्वसाधारणपणे १० टक्के काम स्विकृत झालेल्या दराने विभागून देण्यात येईल. तथापि, ठेकेदारांना आंबा/काजू कलमांचे काम विभागून देण्याचा अंतिम निर्णय मा. सहयोगी संशोधन संचालक यांचा राहील. तसेच प्रकल्पग्रस्त ठेकेदार (ज्याची जमीन विद्यापीठ हितार्थ) संपादीत करण्यात आली असा ठेकेदार काम करू इच्छित असेल तर व त्याला स्विकृत दर मान्य असेल तर अशा ठेकेदारासे ''प्रकल्पग्रस्त'' म्हणून प्राधान्य देण्याच्या दृष्टीने कलमे तयार करण्याच्या कामात समाविष्ट करून काम विभागून देण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत. मात्र विद्यापीठ हितार्थ जमीन संपादीत केली असल्यास पुरावा म्हणून महसूल खात्याच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या दाखल्याची छायांकित प्रत दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे.

२०. आंबा कलमांसाठी बाटयाची व काजू कलमांसाठी बियाण्याची व्यवस्था ठेकेदाराने स्वत: करावयाची आहे.

२१. आंबा व काजू कलमांसाठी लागणाऱ्या मातीची व्यवस्था ठेकेदाराने स्वत: करावयाची आहे.

२२. आंबा कलमांचे दिलेले सर्व उद्‌दिष्ट सप्टेंबर, २०२० महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करावयाचे आहे तर काजू कलमांचे दिलेले उद्‌दिष्ट मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. सदर दिलेल्या मुदतीनंतर आंबा व काजू कलम काडया पुरविल्या जाणार नाहीत.

२३. कलमे बांधण्यासाठी लागणारी माती उत्खनन करुन आणावयाची झाल्यास त्यापोटी देय होणारी सर्व रॉयल्टी व इतर कर यासंबंधीतील अदायगी ठेकेदारास करणे बंधनकारक राहील.

२४. दरपत्रक सादर करताना दरपत्रकासोबत संबंधितांनी पॅन कार्ड सादर करणे आवश्यक आहे.

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले,
ता. वेंगुर्ले, जि.सिंधुदुर्ग.